नि. ४२/४

रे. क. नं. ५/२०२०

मे. दिवाणी न्यायाधिशसो़ा कनिष्ठ स्तर, कळे–खेरीवडे

यांचे कोर्टात........

तुकाराम देवबा जाधव, वगैरे ... वादी

विरुध्द

सुनिल दिनकर पाटील, वगैरे ... प्रतिवादी

<u>सी. पी. सी. ऑर्डर ४७ प्रमाणे ता. २४/०७/२०२५ इा़ा रोजीचे नि. ४० वर झालेल्या आदेशाचे पुर्नविलोकन होवून मिळणेसाठी अर्ज.</u>

<u>यातील प्रतिवादीतर्फे विनंती अर्ज की,</u>

१) सदरचा दावा यातील वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याच्या कामी वादीनी प्रतिवादी यांचे विरुध्द मनाईची दाद मागणीकेलेली आहे.त सेच सदरची दावा मिळकत समाईक मालकी व वडीलार्जित मिळकत असलेचे कथन केलेले आहे. तसेच सदर मिळकतीचे वाटप झाले नसलेबाबत दाव्यामध्ये कथन केलेले आहे. असे असताना वादीनी केवळ मनाईची दाद मागण केलेली आहे. तथापि, दावा मिळकतीच्या वाटपाबाबत कोणतीही दाद वादीनी मागितलेली नव्हती व नाही.

२) यातील प्रतिवादी यांनी याकामी नि. ४० ला सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल ११ प्रमाणे व स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम ४१ प्रमाणे ता.

O Otherside to say 7/8/25

07/08/2025
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

Rls. Copy received. Say will be given on next date.
07/08/25

२९/०४/२०२५ इा रोजी अर्ज दाखल केलेला होता. सदरील अर्जावर मे. कोर्टानी ता. १९/०६/२०२५ इा रोजी वादीविरुध्द विना म्हणणेचा आदेश केलेला होता. सर दिवशी प्रतिवादी यांचे वकीलांनी युक्तीवाद देखील केलेला होता. तद्नंतर ता. १०/०७/२०२५ इा रोजी वादीचे वकीलांनी नि. ४० वर युक्तीवाद केला नाही. तसेच ता. १७/०७/२०२५ इा रोजी वादीचे वकीलांनी नि. ४१ ला अर्ज दाखल करुन नि. ४० वर झालेला विना म्हणणेचा आदेश रद्द होणेसाठी मागणी केलेली होती. सदरचेप्रकरणी नि. ४१ वर प्रतिवादी यांचे म्हणणे येणेसाठी पुढील ता. २४/०७/२०२५ ही नेमलेली होती.

३) तद्नंतर नि. ४१ वर प्रतिवादी यांनी ता. २४/०७/२०२५ इा रोजी म्हणणे दाखल केलेनंतर मे. कोर्टानी वादी यांचा नि. ४१ चा अर्ज रक्कम रु. ४००/- इतकी कॉस्ट करुन मंजूर केलेला होता व सदर दिवशी मे. कोर्टानी नि. ४० वर प्रतिवादी यांचा युक्तीवाद ऐकला नि. ४० नामंजूर असा आदेश पारीत केलेला होता व आहे. वास्तविक वादीनी प्रस्तुतचा दावा कोणतीही substantial relief न मागता दाखल केला असलेमुळे प्रस्तुत दाव्यास स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट मधील तरतुदीची प्रथमदर्शनीच बाधा येत आहे. त्याकारणांने केवळ मनाईचा दावा दाखल करुन वादीनी स्पेसिफिक रिलिफ ॲक्टच्या तरतुदीविरुध्द प्रस्तुत मे. कोर्टाकडून काही न्यायीक आदेश करुन घेणेचा खटाटोप करीत आहेत. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास स्पेसिफिक रिलिफ ॲक्ट कलम ३४ ची on the face of record ची बाधा येत आहे. त्याकारणांने नि. ४० वर मे. कोर्टानी केलेल्या आदेशामध्ये कलम ३४ बाबत व त्यामधील तरतुदीबाबत खुलासा नसलेने सदरच्या आदेशास error apparent on the face of record असा असलेने नि. ४० वरील आदेशाचे पूर्नविलोकन होवून मिळणे न्यायाचे व आवश्यक आहे.

07/08/2025
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

४) प्रस्तुत कामी वर नमूद प्रमाणे मे. कोर्टानी नि. ४० वर ता. २४/०७/२०२५ इा रोजी केलेल्या आदेशाचे पूर्नविलोकन होवून मिळालेस यातील वादी यांचे कोणतेही नुकसान होणेचा न्यायाच्या दृष्टीने संभव देखील नाही. याउलट नि. ४० वर झालेल्या आदेशाचे पुर्नविलोकन होवून न मिळालेस यातील वादी यांचे कायदेशीर हक्क डावलले जाणार असून कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

५) प्रस्तुत प्रतिवादी यांनी दिलेल्या नि. ४० वरील अर्जाचा गुणदोषावर निकाल होणेसाठी तसेच वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेल्या वादावर अंतिमपणे पडदा टाकणेसाठी प्रस्तुत कामी मे. कोर्टानी नि. ४० वर केलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन होणे अत्यंत आवश्यक आहे.

६) मल्टीप्लिसिटी ऑफ प्रोसेडिंग टाळणेसाठी तसेच न्यायच्या व इक्वीटीच्या दृष्टीनेही प्रस्तुत कामी मे. कोर्टानी नि. ४० वर केलेल्या आदेशाचे पुर्नविलोकन होणे आवश्यक व अगत्याचे आहे.

(७) **<u>सबब, प्रतिवादीची विनंती की,</u>**

प्रस्तुत कामी वरील सर्व कारणांचा विचार करुन मे. कोर्टानी नि. ४० वर ता. २४/०७/२०२५ इा रोजी केलेल्या आदेशाचे पुर्नबिलोकन होवून मिळावे ही नम्र विनंती.

---

येणेप्रमाणे अर्ज असे.

कळे–खेरीवडे.

ता. ०७/०८/२०२५

07/08/2025

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.
Kale (Kherivade)

**<u>ॲफिडेव्हीट</u>**

मी यातील प्रतिवादी श्री. सुनिल दिनकर पाटील, व.व. ५९, धंदा – शेती, रा. पणोरे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुा कळे–खेरीवडे.

ता. ०७/०८/२०२५

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

सुनिल दिनकर पाटील

ॲफिडेव्हीट करणार

Yogesh

ॲडव्होकेट

(ॲड. वाय. एस. केसरकर)

**<u>प्रतिज्ञा</u>**

मी यातील प्रतिवादी श्री. सुनिल दिनकर पाटील, व.व. ५९, धंदा – शेती, रा. पणोरे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा कळे–खेरीवडे. ता. ०७/०८/२०२५

सुनिल दिनकर पाटील

Solemnly affirmed before me by
Shri./Smt. Sunil Dinkar Patil
Age 59 Yrs ..... Occup Farm at Panore Tal. Panhala Dist. Kop
who is identified by Adv. Shri./Smt. Y. S.
Kesarkar ......... Whom I know personally

Date: 7/08/2025

Assistant Superintendent

R.C.S. 5/2020.

Order below Exh. 42.

1) Instent application is filed by defendant for review the order which is passed on 24/7/25 at Exh. 40.

2) On 7/8/25 say called from plaintiff accordingly say filed by plaintiff on 21/8/25. Perused the application & say filed by the plaintiff. Heard both sides at length.

3). After perusal of application it appears from the record of the court that order passed below Exh. 40 on 24/7/25. which is judicial order. which can

be changed by def. filing of review or revision of application before Hon'ble. District court for review the order which is passed below exh. 40 on 24/7/2025.

4]. In support of this application def. relied on the judgments.

AIR 1977 SC 2421.

Considering the ratio of the present citation & situation of suit & def have proper remedy available against order passed below Exh. 40. Considering all these aspects I proceed to pass following order

ORDER

1) present application is hereby rejected
2) No order as to costs

[signature]
11/9/25
CJJD